# दैनिक महा मेट्रो

www.mahametronews.in

वर्ष ४ थे : अंक : १२ पुणे, सोमवार, १ सप्टेंबर २०२५

पाने : ४ किंमत : ३.००

RNI NO.MAHMAR2022/87390

VOL NO.04. ISSUE : 12 Pune, Monday, 1 September 2025

Pages : 4 PRICE : 3.00





गणेशोत्सवात देखावे पाहण्यासाठी महात्मा फुले मंडई मेट्रो स्थानकात प्रवाशांची मोठी गर्दी झाली होती.

## दगडूशेठ गणपतीच्या चरणी १३३ किलोचा केक अर्पण

**पुणे । प्रतिनिधी**

सध्या सर्वत्र गणेशोत्सव मोठ्या उत्साहात सुरू असून पुणे शहरात मानाच्या गणेशोत्सव मंडळ तसंच श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंडळाचं मोठ्या संख्येनं भाविक दर्शन घेत आहेत.

तसंच अनेक लोक विविध वस्तू बाप्पाला अर्पण करत आहेत. अशातच आज एका भक्ताच्या वतीनं बाप्पा चरणी तब्बल १३३ किलोचा केक मोदक स्वरुपात बनवून अर्पण करण्यात आला आहे.



सध्या मोठ्या संख्येनं भाविक हे श्रीमंत दगडूशेठ हलवाई बाप्पाचं दर्शन घेत आहेत. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्यावतीनं ट्रस्टच्या १३३ व्या वर्षी गणेशोत्सवात केरळमधील श्री पद्मनाभ स्वामी मंदिराची प्रतिकृती साकारण्यात आली असून देखावा पाहण्यासाठी देखील भाविक गर्दी करत आहेत. पुण्यात हळूहळू गणेशोत्सवात रंगत भरत आहे.

## जनता दरबारात इच्छुकांच्या फ्लेक्सची मांदियाळी

### बॅनरच्या माध्यमातून शक्ती प्रदर्शनाचा केविलवाणा प्रयत्न; मुरलीधर मोहळाची उघड नाराजी

**पुणे । प्रतिनिधी**

येरवड्यातील डॉ. नानासाहेब परुळेकर विद्यालयात केंद्रीय सहकार व विमान वाहतूक मंत्री मुरलीधर मोहोळ यांचे सेवा संपर्क अभियान पार पडले. या जनता दरबारात इच्छुकांनी मोठ्या प्रमाणात बॅनरबाजी केली होती. आगामी महापालिका निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्यांनी शाळेच्या प्रवेशद्वारापासून ते कार्यक्रम स्थळापर्यंत बॅनरबाजी केली होती. हे बॅनर व फ्लेक्स पाहून मोहोळ यांनी या ठिकाणी बॅनर ची काय आवश्यकता आहे. हे बॅनर प्रभागात हवे होते असे म्हणत कार्यकर्त्यांवर नाराजी व्यक्त केली.



जनता दरबार संदर्भात बोलताना मोहोळ म्हणाले, ''खासदार जनसंपर्क सेवा अभियानांतर्गत प्रत्येक विधानसभा मतदारसंघात जनता दरबारचे आयोजन करत असतो. येरवड्यातील डॉ. नानासाहेब परुळेकर विद्यालयातील आठवा जनता दरबार आहे. या ठिकाणी लोहगाव, धानोरी, कळस, टिंगरेनगर व येरवडा परिसरातील मोठ्या प्रमाणात नागरिक आले होते. जनता दरबारामध्ये महापालिका, राज्य सरकार व केंद्र सरकार यांच्या निगडित असलेले प्रश्न नागरिक घेऊन येत असतात . काही समस्या तात्काळ सुटतात तर काही समस्यांना वेळ लागू शकतो मात्र अशा समस्यांचा पाठपुरावा करतो.

लोहगाव येथील ९०० मीटर हवाई हद्द संदर्भात विचारले असता काही दिवसात स्वतंत्र बैठक घेणार असल्याचे मोहोळ यांनी सांगितले. यामध्ये रस्त्याचा विषय असेल विकास आराखडा असेल यासंदर्भात लोहगाव विमानतळ सदर्भा एक

पान ३ वर...

**एका मातेने दिले मोहोळ याना जेवणाचे आमंत्रण !**

**जनता दरबारात पोरवाल रस्तयावरील एका हॉटेल मध्ये काम करणारी महिला आली होती. महिलेने आपण विधवा असून संजय गांधी निराधार योजना लागू व्हावी अशी मागणी केली. मोहोळ यांनी ''आई'' म्हणुन संबोधल्याचे महिलेने सांगितले. हे ऐकून समाधान वाटले . काम नाही झाले तरी दोन शब्द गोड बोलले याचे समाधान आहे. त्यांना (मोहोळ) मी काम करीत असलेल्या हॉटेल मध्ये स्वखर्चाने जेवणासाठी आमंत्रण दिले आहे. त्याला खासदार साहेबानी होकार दिल्याचे महिलेने सांगितले.**

## गुन्हेगार लखन भोसले पुण्यात पोलिस एन्काऊंटरमध्ये ठार

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील शिक्रापूर परिसरात सातारा पोलिसांनी केलेल्या कारवाईत कुख्यात घरफोडी प्रकरणातील आरोपीचा एन्काऊंटर करण्यात आला आहे. लखन भोसले असे मृत आरोपीचे नाव असून तो अनेक घरफोडी आणि गंभीर गुन्ह्यांमध्ये पोलिसांच्या वॉन्टेड लिस्टमध्ये होता. ही कारवाई आज (दि. ३० ऑगस्ट) संध्याकाळी ६ वाजता करण्यात आली. या दरम्यान त्याचा दुसरा एक साथीदार घटनास्थळावरून पसार होण्यात यशस्वी झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शिक्रापूर परिसरात गेल्या काही दिवसांपासून घरफोड्यांच्या घटना वाढल्या होत्या. या घटनांमुळे नागरिकांमध्ये



भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर सातारा पोलिसांनी विशेष पथक तयार करून तपास सुरू केला. पोलिसांना गुप्त माहितीच्या आधारे शिक्रापूरजवळ संशयित आरोपी लखन भोसले आणि त्याचा साथीदार या भागात असल्याची टीप मिळाली.

दोन दिवसांपूर्वी लखन भोसलेने चाकूचा धाक दाखवून एका महिलेच्या गळ्यातील

पान ३ वर...



## गोळीबार करुन पळुन जाणाऱ्या आरोपीस केले २४ तासांत जेरबंद

**पुणे । प्रतिनिधी**

अश्वमित हाऊस विरभद्रनगर बाणेर येथे महीलेवर एका अनोळखी व्यक्तीने फायरिंग केली होती. त्या अनुषंगाने बाणेर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला होता. गुन्ह्यातील आरोपी गौरव महेश नायडु ( वय २५ वर्षे, रा. श्रीरंग रेसिडेन्सी, गायकवाडनगर पुनावळे) याला सापळा रचून अटक केले. युनिट चारचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय वाघमारे

पान ३ वर...

## महिलेचा वेष व मास्क धारण करून कंपनीत केली चोरी

**पुणे । प्रतिनिधी**

हडपसर येथील हारको ट्रान्सफार्मस् कंपनी लिमिटेड या कंपनीत रात्री दोन अनोळखी व्यक्तींनी वेषांतर करून चोरी केली. एकाने पिवळे रंगाचा गाऊन व दुसऱ्याने गुलाबी रंगाची सलवार कमीज घालुन, तोंडाला ओढणी व मास्क बांधुन खिडकीचा गज तोडून, कंपनीत आतमध्ये प्रवेश करुन कंपनीचे इंन्व्हेट्री रुममध्ये ठेवलेले ताब्यांचे वायर व पट्ट्या दोन लाख १९ हजार रु. किंमतीचे मुद्देमाल चोरला.

या गुन्हयाचा तपास केला असता पोलीसाची दिशाभूल व्हावी या हेतूने यातील आरोपी




यांनी महिलांचा वेश परिधान करून हारको ट्रान्सफार्मस् कंपनीत गज तोडून प्रवेश करून ताब्यांचे वायर व पट्ट्या चोरून नेल्या. परंतु तपासामध्ये

पान ३ वर...



## महिलेचे गळयातील मंगळसुत्र हिसकाऊन घेवुन चोरी करणारे आरोपी जेरबंद

**पुणे । प्रतिनिधी**

सहकारनगर , लक्ष्मीनगर पर्वती पुणे येथे मोपेड मोटार सायकल वरील अज्ञात दोन व्यक्तींनी एका महिलेच्या गळयातील सोन्याचे मंगळसुत्र बळजबरीने हिसकावुन घेवुन चोरी केले होते. गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार गायकवाड व पोलीस निरीक्षक (गुन्हे) अनिता

पान ३ वर...

## नागरी संरक्षण दलाची तीन हजार चौ. मी. भूखंड वाचला

### प्रस्तावित राज्य आपत्ती निवारण दलाची जागा हडपण्याचा प्रयत्न फसला



**पुणे । प्रतिनिधी**

पर्वती, सिटी सर्व्हे नंबर २३० येथील अतिशय मोक्याची नागरी संरक्षण दलाची तब्बल तीन हजार चौ.मी. भूखंड सरकारी जमा करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाने दिले होते. या जागेचा गेली दहा वर्षांपासून वापरच होत नसल्याचा खोटा अहवाल पुणे शहर तहसिलदारांनी तयार केला होता. याठिकाणी नागरी संरक्षण दलाचा केंद्र सरकारच्या धर्तीवर राष्ट्रीय आपत्ती निवारण दल प्रमाणे राज्य आपत्ती निवारण दलतयार करण्याचा प्रस्ताव आहे. ही जागा कोणाच्या तरी घशात घालण्याचा प्रयत्न होता. मात्र, राज्य सरकारच्या महसूल विभागाने त्याला स्थगिती देऊन ही जागा नागरी संरक्षण विभागाच्याच ताब्यात ठेवले आहे.

पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाने १२ ऑगस्ट १९६४ मध्ये मौजे पर्वती येथील सात एकर जागा नागरी संरक्षण दलाला नियंत्रण कक्ष व प्रशिक्षण केंद्रासाठी दिली होती. नागरी संरक्षण दल स्वयंसेवकांचे सराव, प्रशिक्षण व नियंत्रण कक्षासाठी वापरत आहे. पुणे हे लोकसंख्येच्या बाबतीत अत्यंत वेगाने वाढणारे शहर आहे. गृह विभाग नागरी संरक्षण दलासाठी विविध प्रशिक्षणासाठी जागा कमी पडत आहे. तसेच युद्धजन्य

पान ३ वर...

**जागाच हडपण्याच प्रयत्न**

**राज्य आपत्ती निवारण दलासाठी पर्वती येथील जागेची निवड पर्वती येथील नागरी संरक्षण दलाची जागा राज्य आपत्ती निवारण दलासाठी निवड केली आहे. यासह याठिकाणी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापनासाठी उपकेंद्र निर्माण करण्याचा राज्य सरकारचा प्रस्ताव आहे. मात्र, ही जागाच हडपण्याच प्रयत्न सुरू होता. ही सरकार हक्काची जागा कवडी मोल किंमतीत लाटण्याचा प्रयत्न होता. मात्र, ही जागा आता नागरी संरक्षण दलाकडेच राहणार आहे.**

## बारामतीत स्पीड ब्रेकरमुळे मेडिकलच्या विद्यार्थिनीचा मृत्यू

**बारामती । प्रतिनिधी**

बारामतीत रस्त्याच्या अपघातांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली असून, आत्तापर्यंत अवजड वाहनांच्यामुळे अपघात होत होते. हे अपघात होऊ नयेत म्हणून जे स्पीड ब्रेकर तयार केले..! त्यावरून देखील एक अपघात झाला आहेरात्री दहाच्या सुमारास बारामती शहरातील भिगवन रस्त्यावर गतिरोधकाचा अंदाज न आल्याने दुचाकी डिव्हायडरला धडकली आणि वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या युवतीचा यात मृत्यू झाला.

बारामती भिगवण रस्त्यावर ऊर्जा भवननजीक हा अपघात रात्री साडेदहाच्या दरम्यान घडला. या घटनेत शरयू संजय मोरे या २२ वर्षीय वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीचा मृत्यू झाला.

शरयू मोरे ही तिच्या एका मैत्रिणीसह दुचाकीवरून शनिवारी रात्री बारामतीतून एमआयडीसी



परिसरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या वस्तीगृहाकडे निघाली होती. भिगवन रस्त्यावरील ऊर्जा भवन नजीक तिची दुचाकी आली असता, ऊर्जा भवन नजीकचा गतिरोधकाचा अंदाज तिला आला नाही आणि तिची दुचाकी डिव्हायडरला धडकली. यात दुचाकी चालवणाऱ्या शरयूचा जागीच मृत्यू झाला तर तिची दुसरी मैत्रीण जखमी झाली.

पान ३ वर...

## महत्वाचे...

### पेट्रोल पंपावर मारहाण व खंडणीची धमकी; तीन जणांविरोधात गुन्हा

**पुणे । प्रतिनिधी**

चाकण परिसरातील पुणे-नाशिक महामार्गावरील गवतेवस्ती, मेदनकरवाडी येथील भारत पेट्रोल पंपावर हप्ता न दिल्यास मोफत पेट्रोल द्यावे लागेल, अशी धमकी देत ९० रुपयांचे पेट्रोल फुकट भरून घेतल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. शनिवारी मध्यरात्री हा प्रकार घडला. घटनेत पंपावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला लोखंडी वस्तूने मारहाण करून दुखापत करण्यात आली. त्यांना थांबविण्यास आलेल्या सहकाऱ्यालाही आरोपींनी शिवीगाळ व मारहाण केली. आम्ही इथले भाई आहोत, पंप चालवायचा असेल तर ५ हजार रुपये हप्ता द्यावा लागेल, असे ओरडून आरोपींनी परिसरात दहशत निर्माण केली. या प्रकरणी अतुल अर्जुन तांबे (१९, चाकण), सोहम श्रीकांत माने (१८, वराळे) व ओंकार सुरेश बागल (२०, देहू) या तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### निगडीतील कंपनीवर १.२६ कोटींची फसवणूक प्रकरणी गुन्हा

**पुणे । प्रतिनिधी**

मार्च २०२३ पासून सुरु असलेल्या गुंतवणूक फसवणूक प्रकरणी एसपीव्हीएस ग्रुप ऑफ कंपनीवर निगडी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कंपनीच्या निगडी व वाशी कार्यालयातील संचालक विकास दादा निकम (रा. वाशी, मूळ खांडस सांगवी, बारामती) व सचिन बाबासो डोंगरे (रा. कलकी, फलटण, सातारा) यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. या कंपनीने चांगल्या परताव्याचे आमिष दाखवून गुंतवणूक स्वीकारली. सुरुवातीस काही रक्कम परत देत विश्वास संपादन केला; मात्र नंतर एकूण १ कोटी २६ लाख ७५ हजार ४८३ रुपये परत न करता स्वतःच्या फायद्यासाठी वापरले. यामध्ये संबंधित व्यक्तींसह त्यांचे नातेवाईक व मित्र यांचीही मोठी फसवणूक झाली आहे. या प्रकरणी महाराष्ट्र प्रोटेक्शन ऑफ इन्व्हेस्टर्स डिपॉझिट (एमपीआयडी) कायद्यान्वये कलम ३, ४ सह भारतीय न्याय संहितेच्या कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींपैकी विकास निकम सध्या तळोजा कारागृहात आहे. तपास पोलीस निरीक्षक मिसाळ करीत आहेत.

### चाकणमध्ये भीषण अपघात : पादचारी गंभीर जखमी

**पुणे । प्रतिनिधी**

चाकण नगरपरिषदेच्या हद्दीत वाघेवस्ती पुलाजवळ शुक्रवारी रात्री झालेल्या अपघातात एक व्यक्ती गंभीर जखमी झाला. शेवगाव येथील ४६ वर्षीय राजू पोपट परदेशी हे सर्व्हिस रोडने पायी जात असताना आंबेठाण चौकाकडून येणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या युको व्हॅनने त्यांना जोराची धडक दिली. त्यानंतर मागून आलेल्या स्विफ्ट कारने देखील धडक दिली. या अपघातात परदेशी यांच्या उजव्या पायाचे मांडीचे हाड फ्रॅक्चर झाले असून डाव्या पायाला व हाताला गंभीर दुखापती झाल्या आहेत. धडक दिल्यानंतर दोन्ही वाहनं घटनास्थळावरून पसार झाली. या प्रकरणी चाकण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.